# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३**

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री** :

**(क)** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : शासनाच्या नगरविकास विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(४) संसदीय कार्य मंत्री :** महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक २५ मार्च, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ५३१ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १४८ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महानगरपालिकांनी विविध सेवाभावी सामाजिक संस्थांना महापालिकेच्या वास्तू व जागा ग्रंथालये, अभ्यासिका, व्यायामशाळा, जेष्ठ नागरिक संघ, ध्यानधारणा केंद्र, निसर्ग उपचार केंद्र, सांस्कृतिक उपक्रम यासाठी कराराने दिल्या असणे, सदर वास्तूंमध्ये लोकप्रतिनीधींनी त्यांचे ऐच्छिक निधीतून बांधलेल्या मिळकतींचा तसेच समाज मंदिरांचा समावेश असणे, गेल्या अनेक वर्षांपासून अनेक समाज ऊपयोगी उपक्रम त्यामधून राबविले जात असणे, सदर उपक्रम महापालिकेच्या ध्येय आणि धोरणांशी सुसंगत असून महापालिकेवर कुठलाही आर्थिक बोजा न येणे, शासनाने केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८९ प्रमाणे नाशिक महापालिकेकडून रेडीरेकनरच्या दराने निर्धारीत केलेल्या मूल्यांकनाच्या ८% + दरमहा २% व्याजासह भाडे आकारणे, प्रचलित बाजारमूल्याच्या ८% दराने भाडे भरणे, सामाजिक संस्थांना शक्य नसल्याने शहरातील संपूर्ण सांस्कृतिक, सार्वजनिक उपक्रम नामशेष होण्याचा धोका असणे, त्यामुळे अनेक सभा मंडप बंद अवस्थेत पडून असणे, महापालिकेकडून सदर वास्तूंची देखभाल होत नसल्याने त्याचा गैरवापर होत असणे, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याचे कलम ७९ मधील तरतुदींचा विचार करुन ज्या सार्वजनिक समाज ऊपयोगी संस्थांना सार्वजनिक प्रयोजनाकरता मिळकती दिल्या आहेत व तसा त्यांचा वापर होत आहे त्यांना माफक दराने भाडे आकारणी करणेबाबत निर्णय होणे गरजेचे असणे, त्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक असणे, वारंवार मागणी करून देखील शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे विविध सामाजिक संघटना व नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) डॉ. राहुल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी महानगरपालिकांतर्गत सन २०१८ मध्ये १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, सदर कामासाठी माहे मार्च, २०१८ मध्ये १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे, सद्यःस्थितीत निधीअभावी सदर नाट्यगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे, नाट्यगृहाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी अजून ११ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असणे, या नवीन नाट्यगृह बांधकामासाठी वाढीव ११ कोटी ७५ लाख रुपये निधीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १६ जून, २०२२ रोजी परभणी महानगरपालिकेने शासनास सादर केलेला असणे, सदर वाढीव निधीस मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत निधी मंजूर न होणे, परिणामी सदर नाट्यगृहाचे काम अद्यापही निधीअभावी रखडलेले असणे, त्यामुळे जिल्ह्यातील व परिसरातील कलावंतांची होणारी फरफट, शासनाने परभणी येथील १००० आसन क्षमतेच्या मंजूर नवीन नाट्यगृहाचे काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.सुनिल टिंगरे, श्रीमती.श्वेता महाले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरात पोलीस कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध होणे गरजेचे असणे, त्यासाठी राज्यातील आजी माजी पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेची सन २००९ मध्ये स्थापना करणे, लोहगाव या ठिकाणी गृहप्रकल्प उभारण्याचे ठरवणे, सभासद फीच्या माध्यमातून सात हजार पोलीस कर्मचाऱ्यांकडून फंड जमा करणे, सदर गृहप्रकल्पाची जमीन कंत्राटदाराच्या नावावर घेणे, अद्यापही विकासकाने गृहप्रकल्प पूर्ण केलेला नसणे, गृहनिर्माण संस्थेच्या संचालकांनी ५२५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे कर्मचारी सभासदांच्या लक्षात येणे, बारा वर्ष होऊनही अद्याप घरे उपलब्ध न झाल्याने पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.भास्कर जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"रत्नागिरी जिल्ह्यातील तिवरे (ता.चिपळूण) येथील धरण फुटून २३ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतांनाच चिपळूण तालुक्यातील कळवंडे येथील धरणाच्या दुरूस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याची आणि त्यामुळे यावर्षी धरणात पाणीसाठा करण्यात येणार नसल्याची धक्कादायक बाब दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास समोर येणे, पावसाळा सुरू व्हायच्या काही दिवस आधी या कामाची सुरूवात होणे, धरणाच्या आतील बाजूकडील मुख्य भिंतीवरील दगडमातीचा आधीपासून असलेला थर काढून तिथे प्लास्टीकचे कापड अंथरण्यात येणे, हे कापड अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे, तसेच झालेले कामही दर्जाहीन असणे, परिणामी पहिल्याच पावसात नव्याने करण्यात आलेल्या कामाच्या जागी ठिकठिकाणी भिंतीचा भाग खचल्याचे आणि त्यामुळे धरणाला गळती लागल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या निदर्शनास येणे, त्यांच्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण होणे, त्यातून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या बेपर्वाई, हलगर्जीपणाविरोधात हजारो ग्रामस्थांनी एकत्र येऊन संताप व्यक्त करणे, अधिकारी व ठेकेदार यांच्यातील संगनमतामुळे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होणे, तिवरे धरणफुटीच्या दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील इतर धरणांच्या दुरूस्तीची कामे शासनाकडून हाती घेण्यात येणे, परंतु, अनुभव नसलेल्या ठेकेदारांना ही कामे देण्यात येणे, अशा ठेकेदारांना अधिकारीच पाठिशी घालत असल्याची बाब कळवंडे धरणाच्या कामानंतर समोर येणे, ग्रामस्थ व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर धरणात पाणीसाठा न करण्याचा निर्णय संबंधित विभागाकडून घेण्यात येणे, निकृष्ट दर्जाचे काम सर्वांसमोर येऊ नये म्हणून धरणाची छायाचित्रे व चित्रीकरण करण्यात येऊ नये, असा फलक संबंधित विभागाकडून धरणाच्या ठिकाणी लावण्यात येणे, एकूणच धरण परिसरातील हजारो ग्रामस्थ, रहिवाशांच्या जीवाशी खेळण्याचा सुरू असलेला अत्यंत संतापजनक प्रकार, धरणात पाणीसाठा न करण्याचा निर्णय करण्यात आल्याने धरणाच्या पाण्यावर शेती, भाजीपाला लागवड व बागायती करून उदरनिर्वाह भागविणाऱ्या कळवंडे व पंचक्रोशीतील राहिवाश्यांवर ओढवणारे उपासमारीचे संकट, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आदींबाबत चिंतेचे वातावरण, त्यांच्यात निर्माण झालेली प्रचंड संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री.बळवंत वानखडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती शहरातील आंबेडकरी जनतेचे श्रद्धास्थान असलेले इर्विन चौक येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यालगतची खाजगी जागा पुतळा परिसर

सौंदर्यीकरणाकरीता संपादीत करणेबाबत मनपा स्थायी समिती ठराव क्र.६, दिनांक १३ एप्रिल, २०१२ (कायम दिनांक २१ एप्रिल, २०१२) अन्वये ठराव मंजूर करण्यात आलेला असणे, अमरावती शिट क्र.४८ भूखंड क्र. ५ (भाग) या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सद्यस्थितीत स्थित असणे या जागेचे उत्तरेस शिट क्र.४१ भूखंड क्र. १ (भाग) या जागेवर पुर्वी पेट्रोलपंप असणे, आज रोजी सदर जागा खुल्या स्वरुपात असून सदर जागा खाजगी मालकीची असणे, सदर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील म्युरल (भिंती शिल्प) व परिसराचे सौदर्यीकरण करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित केलेले असणे, सदर जागा संपादित करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पत्र क्र. ८३१, दिनांक ८ एप्रिल, २०१५ अन्वये जिल्हा प्रशासनाकडे सादर करणे, सदर जागेचे भूसंपादनाच्या अनुषंगाने महानगरपालिका, अमरावतीमार्फत भूसंपादन अधिकारी, अमरावती यांचेकडे आस्थापना शुल्क, मोजणी शुल्क तसेच भूसंपादनाचा एकूण खर्च रु.३,३९,९८,६६०/- रक्कम धनादेशाद्वारे जमा केलेला असणे, त्यानंतर भूसंपादन अधिनियम कलम १९ ची अधिसूचना दिनांक ३१ मे, २०१६ ला भूसंपादन अधिकारी, अमरावती यांनी प्रसिध्द केलेली असणे, अमरावती शहराची प्रारूपविकास योजना (दु.सु.) मध्ये सदर जागे मध्ये M-३३ अन्वये आरक्षण क्र. ९७(A) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सौंदर्यीकरणाकरीता प्रस्तावित असून त्याला शासनाची मान्यता असणे, परंतु अद्यापही सदर जागेचे भूसंपादन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील सौंदर्यीकरणासाठी उपलब्ध करून देणेबाबत शासनामार्फत विलंब होत असणे, यामुळे शहरातील तसेच जिल्ह्यातील आंबेडकरी जनता तसेच विविध संघटनांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री.राजेश पाटील, क्षितीज ठाकूर, हितेंद्र ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" पालघर जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर जिल्ह्यात लोकसंख्या झपाट्याने वाढणे, परंतु जिल्ह्यात मुलभूत सुविधांचा असलेला अभाव, आजमितीस पालघर व बोईसर येथे एकच सरकारी दवाखाना असून केवळ चार डॉक्टर्स कार्यरत असणे, तसेच जिल्ह्यात राज्य विमा कामगार मंडळाचे रुग्णालय नसल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांना उपचाराअभावी मृत्यूला सामोरे जावे लागत असणे, जिल्ह्यात १५० खाटांचे रुग्णालय प्रस्तावित असून पालघर जिल्ह्यातील बोईसर औद्योगिक क्षेत्रामध्ये पाच एकर जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने केलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालून पालघर जिल्ह्यात प्रस्तावित असलेल्या राज्य विमा कामगार मंडळाच्या रुग्णालयाकरिता बोईसर औदयोगिक क्षेत्रानजिकची पाच एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वन विभाग गडचिरोली, आलापल्ली व वडसा मध्ये सामूहिक वन हक्क व पेसा अंतर्गत कंपार्टमेंट मध्ये ग्रामसभांच्या माध्यमातून बांबू कटाई करण्यात येणे, मात्र या ग्रामसभांकडे तांत्रिक मनुष्यबळ पुरेसे नसल्याने ती बांबू कटाई वनविभागाच्या माध्यमातून करण्यात येणे, यामध्ये गडचिरोली वनसंरक्षक व गडचिरोली, आलापल्ली व वडसा विभागातील उप वनसंरक्षक, सहाय्यक उप वनसंरक्षक व संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी संगनमताने आणि ग्रामसभांना विश्वासात न घेता सामूहिक वन हक्क व पेसा वनक्षेत्रा व्यतिरिक्त डीप फॉरेस्ट मधून मोठ्या प्रमाणामध्ये बांबूची कटाई करत असल्याचे निदर्शनास येणे, मागील ७५ वर्षांमध्ये जेवढी बांबू कटाई करण्यात आलेली नाही तेवढी बांबू कटाई या १ वर्षाच्या कालावधीत झाल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे मागील १ वर्षात जिल्हयातील किती ग्रामसभांना, किती प्रमाणामध्ये बांबू कटाई करण्याची परवानगी देण्यात आली, प्रत्यक्षात किती कटाई झाली त्याप्रमाणात किती बांबूची लागवड झाली व त्यामध्ये अधिक प्रमाणात कटाईसाठी जे अधिकारी दोषी आहेत त्यांचेवर कारवाई करणे, जिल्ह्यात केवळ बांबू कटाई करण्यात येत असून त्या ठिकाणी बांबूची लागवड केली जात नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान होणे, यासंदर्भात उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयामध्ये दोनदा बैठक घेण्यात येणे, मात्र त्यामध्ये वनविभागाच्या अधिकाऱ्यांची उदासिनता दिसून येत असल्याने कोणत्याही प्रकारचे सकारात्मक निर्णय न लागणे, अवैध बांबु कटाई अशीच सतत सुरू राहिल्यास काही कालावधीनंतर जिल्ह्यातील बांबू संपूर्णतः नष्ट होण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे सदर प्रकरणातील गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्याची व त्यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाने यासंदर्भात तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री.सुनिल कांबळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत राज्यभरात ९७७ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा चालविल्या जात असणे, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शासन भोजन अनुदान हे माहे मार्च अखेर ४०% तसेच शाळा सुरु होतांना माहे जूनच्या पहिल्या आठवड्यात ६०% भोजन अनुदान शासन देत असणे, परंतु सन २०२१ ते २०२३ या वर्षात राज्यातील बहुतांश शाळांना भोजन अनुदान न मिळणे, पुणे जिल्ह्यात एकूण २८ शाळा असून २४ शाळांना अद्याप भोजन अनुदान प्राप्त न झाल्याने संस्था चालकांसमोर शाळा कशा चालवावयाच्या हा प्रश्न निर्माण होणे, भोजन अनुदान वाटपात अधिकाऱ्यांची मनमानी व अनियमितता असल्याने विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ येणे, विजाभज आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांचे दरमहा वेतन हे जिल्हा

स्तरावरून होते, परंतु मंजूरी विभाग स्तरावरून दिली जात असल्याने त्याला उशिर होणे, त्यामुळे मंजूरीचे अधिकार हे जिल्हा स्तरावर देण्यात येण्याची आवश्यकता असणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना बारा वर्षानंतर ही कालबद्ध पदोन्नती दिली जात नसणे, शिक्षण विभागात मात्र कालबद्ध पदोन्नती ही सर्वांना दिली जाणे, आश्रम शाळेमध्ये फक्त कोर्टातून आदेश प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांनाच कालबद्ध पदोन्नती मिळणे, सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय या दृष्टीने आश्रम शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती देण्यात येण्याची आवश्यकता, विजाभजच्या सर्व आश्रम शाळा ह्या शालेय शिक्षण विभागाच्या नियमानुसार चालणे, शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांपेक्षाही आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांना निवासी शाळा असल्याने जास्तीचे काम करावे लागणे, तरीही बहुजन कल्याण विभागाकडून माध्यमिक आश्रम शाळेतील मुख्याध्यापकांना बारा वर्षानंतरच्या वरिष्ठ वेतनश्रेणी ही S-22 मध्ये येत असूनही S-20 ही श्रेणी देणे अन्यायकारक असणे, ती दुरुस्त करण्याची आवश्यकता, प्राथमिक शाळेला माध्यमिक शाळेचे इयत्ता नववीचे वर्ग हे श्रेणीवाढ म्हणून देता येत नसणे, यासाठी स्वतंत्र माध्यमिक शाळेसाठी मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, कारण प्राथमिक शाळेचा यु-डायस व माध्यमिक शाळेचा यु-डायस स्वतंत्र असणे आवश्यक असणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अतिशय चांगल्या पद्धतीचे ज्ञानार्जनाचे काम करता येण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शालेय साहित्य वाटप करतांना त्यामध्ये ४X६ आकाराच्या स्मार्ट डिजिटल बोर्डाचा समावेश करण्याची आवश्यकता, विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रत्येक आश्रम शाळेत वाढत असणे, परंतु अनेक आश्रम शाळेत आज विद्यार्थी संख्येनुसार व आर.टी.ई. कायद्यानुसार आश्रम शाळेतील संचमान्यता होत नसल्याने अनेक विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहात असणे, त्यामुळे विजाभज आश्रम शाळेची संच मान्यता ही विद्यार्थी संख्येनुसार करून शिक्षक पदे वाढवून मिळण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(९) श्री.समाधान अवताडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" माहे जुलै च्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात लोकप्रतिनिधी या नात्याने माझ्या पंढरपूर मंगळवेढा मतदार संघात गाव भेट दौऱ्यानिमित्त अनेक गावात दौरा करताना चारा छावणी व पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची समस्या ऐरणीवर असल्याचे निदर्शनास येणे, अनेक शेतकऱ्यांचे पशुपालन हे उदरनिर्वाहाचे जोडसाधन असणे,परंतु सध्या पावसाने ओढ दिल्याने पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची खूप मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण झाली असणे, या भागातील पाण्याची भूजल पातळी ८०० ते १००० फुट एवढ्या खोलीवर असल्यामुळे पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याची समस्या अतिशय गंभीर झालेली असणे,त्याचबरोबर पाण्याची उपलब्धता नसल्यामुळे अनेक पशुपालक मिळेल

त्या दराने ४००० ते ५००० हजार रुपये प्रती टन दराने ऊसाचा चारा दुस-या तालुक्यातून आणत असणे, गावभेट दौरा सुरु असताना अनेक शेतकरी व पशुपालक यांनी या टंचाईच्या पार्श्वभूमीवर चारा डेपो किंवा चारा छावणी व पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु करण्याची मागणी केलेली असणे, मंगळवेढा तालुक्यातील पशुपालकांची मोठी संख्या पाहता तब्बल चार लाख ते साडेचार लाख लिटर दुधाचे प्रतीदिन संकलन होत असणे, पशुपालन हा येथील जनतेच्या अर्थकारणाचा महत्वपूर्ण भाग असून त्यातील प्रमुख असा दुध व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व पशुधन जगविण्यासाठी तात्काळ सदर चारा डेपो किंवा चारा छावणी व पिण्याचे पाण्याचे टँकर त्वरित सुरु करणेबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)**

(१) महसूल व वन विभाग

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(३) नगरविकास विभाग

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग

(५) आदिवासी विकास विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**पाच : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अनिल देशमुख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. विकास ठाकरे, अमीन पटेल, अमित देशमुख, धिरज देशमुख, नाना पटोले, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री. मोहन मते, जयंत पाटील, चेतन तुपे, रविंद्र वायकर, अतुल भातखळकर, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, अजय चौधरी, दिलीप मोहिते-पाटील, अबू आजमी, जयकुमार रावल, श्रीमती श्वेता महाले, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचारात वाढ झालेली असून देशपातळीवर महाराष्ट्राचा महिला अत्याचारात तिसरा क्रमांक असल्याची चिंताजनक माहिती माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, कामावर महिलांचा छळ होण्याच्या घटनांमध्ये १३९ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बलात्कार आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये २१७

टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असणे, गत वर्षात सुमारे चार हजार महिला व मुली गायब असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, गायब असलेल्या महिला, मुलींना शोधण्यात आलेले नसणे, महिला, मुली व बालकांवरील अत्याचारासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास प्रशासनास आलेले अपयश, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, या बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश दिसून येणे, त्यामुळे महिला व मुली असुरक्षित आहेत हे स्पष्ट दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील एकूण १७ पोलीस ठाण्यांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ५ एप्रिल, २०२३ दरम्यान एकूण २८३ जणांचा विविध कारणांमुळे आकस्मिक मृत्यू झालेला असणे, त्यापैकी २६६ जणांचे वारसदार आढळून येणे तर १७ जण बेवारस असल्याची नोंद पोलीस दप्तरी झालेली असणे, याच कालावधीत २४४ जण हरवल्याच्या तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी २० जणांना शोधून काढण्यात पोलिसांना यश येणे, त्यात २ पुरुष १ महिला, ४ मुले आणि ८ मुलींचा समावेश असणे, एकूण ९८ महिला, ७७ मुली व ६८ पुरुष आणि ३३ मुले अद्यापही पोलीस दप्तरी बेपत्ता असल्याची नोंद झालेली असणे, तसेच माहे जानेवारी, २०२३ ते माहे मार्च, २०२३ या ३ महिन्यांच्या कालवधीत राज्यातील ५,६१० तरुणी व महिला बेपत्ता असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये १६ ते २५ या वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणींचा समावेश असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सर्वाधिक २,२०० मुली व महिला बेपत्ता झाल्यापासून बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसाला सरासरी ७० असे असणे, बेपत्ता झालेल्या मुली व महिला यांचे प्रमाण पुणे येथे अधिक असून पुण्यातून २,८५८ मुली व महिला बेपत्ता झालेल्या असणे, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे राहणाऱ्या व पुण्यात अभ्यास करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत चांगले यश मिळवून अधिकारी झालेल्या दर्शना पवार यांचा मृतदेह दिनांक १८ जून, २०२३ रोजी वेल्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत आढळून येणे, पोलिसांनी याबाबत चौकशी करुन आरोपी श्री.राहुल हंडोरे याला दिनांक २२ जून, २०२३ रोजी अटक करणे, श्रीमती पवार ह्या ८ दिवसांपासून बेपत्ता झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, त्यानंतर त्यांचा मृतदेह पोलिसांना पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत सापडणे, आरोपीने हत्या केल्याची कबुली पोलिसांकडे देणे, ही घटना ताजी असतानाच दिनांक २७ जून, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पुण्यात एका तरुणीवर कोयत्याने हल्ला करुन एकतर्फी प्रेमातून तिची हत्या करण्याच्या उद्देशाने कोयता घेऊन एका तरुणाने तिच्या मागे धावून तिची हत्या करण्याचा प्रयत्न करणे व थोडक्यात तिची हत्या करण्यात अपयशी ठरल्याची घटना उघडकीस येणे, या हल्ल्यात तरुणी जखमी होणे, मात्र दोन तरुणांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून या तरुणीची जीवघेण्या हल्ल्यातून सुटका करणे, महिला-मुलींवरील अत्याचार आणि बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ, तसेच महिला बेपत्ता होण्याचे व एकतर्फी प्रेमातून महिलांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटनांमुळे राज्यातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, राज्यातील महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ — नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ — महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमीन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड‍ यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, नाना पटोले, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरीष चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमीन पटेल, विकास ठाकरे, सुभाष धोटे, जितेश अंतापूरकर, शिरीष चौधरी, संजय जगताप, नाना पटोले, अमित झनक व बळवंत वानखडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ – एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ – डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२३.

---

**(शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती**

**शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय

अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा